म.टा. 4/12/2017 Pg No.15

# इथिओपियाचा बेशा विजेता

म. टा. प्रतिनिधी, पुणे

इथिओपियाच्या गेताचेव बेशा याने रविवारी पुणे मॅरेथॉनमध्ये २ तास १५ मिनिटे आणि ९ सेकंद अशी वेळ नोंदवून अव्वल क्रमांक पटकावला. महिलांच्या अर्ध मॅरेथॉनमध्ये इथिओपियाच्या तिसासू बासाझिनने बाजी मारली. तिने १ तास १५ मिनिटे ३१ सेकंद वेळ नोंदवली.

सारस बागेजवळून पहाटे साडेपाच वाजता मॅरेथॉनला सुरुवात झाली. माजी

## पुणे मॅरेथॉन

ऑलिंपियन बाळकृष्ण अकोटकर आणि आंतरराष्ट्रीय जलतरणपटू रोहन मोरे यांनी स्पर्धेला हिरवा झेंडा दाखविला. भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने पुणे मॅरेथॉनला मान्यता नाकारली होती. समारोपा प्रसंगी महापौर मुक्ता टिळक म्हणाल्या, 'तांत्रिक गोष्टी स्पष्ट होत नाही, तोपर्यंत पालिकेकडून कुठलाही निधी दिला जाणार नाही.' या स्पर्धेतील विजेत्यांना पालिकेच्या वतीने सुमारे ३५ लाख रुपयांची बक्षिसे दिली जाणार होती. त्यामुळे विजेत्यांना समारोपाच्या वेळी केवळ पदक आणि ट्रॉफी देण्यात आल्या.



स्वप्नील शिंदे

गेताचेव बेशा

### स्पर्धेचे निकाल

**पूर्ण मॅरेथॉन (४२.१९५ किमी)**

- गेताचेव बेशा (इथिओपिया) : २ तास १५ मिनिटे ९ सेकंद
- झेलालेम लेमा दलेमा (इथिओपिया) : २ तास १५ मिनिटे ३४ सेकंद
- देवेजे कसाव (इथिओपिया) : २ तास १७ मिनिटे २४ सेकंद

**महिला अर्ध मॅरेथॉन (२१ किमी)**

- तिसासू बासाझिन (इथिओपिया) : १ तास १५ मिनिटे ३१ सेकंद
- अगेर बेलेव (इथिओपिया) : १ तास १५ मिनिटे ३३ सेकंद
- पास्कलिया जेपकोजेल (केनिया) : १ तास १६ मिनिटे ५८ सेकंद

**भारतीय गटात करण, संपदाची सरशी**

भारतीय गटात खडकीतील 'बीईजी'च्या करणसिंग याने बाजी मारली. त्याने ४२.१९५ किलोमीटर अंतराची शर्यत २ तास २८ मिनिटे १ सेकंदांत पूर्ण केली. त्याने भारतीय गटातील गतविजेता किशोर गव्हाणेला मागे टाकले. 'बीईजी'च्या किशोरने २ तास २९ मिनिटे २६ सेकंद अशी वेळ नोंदवली. यानंतर 'बीईजी'चाच


संपदा बुचडे

दादासाहेब खिलारे (२ तास ४० मिनिटे २७ सेकंद) तिसऱ्या स्थानी राहिला. महिलांच्या अर्धमॅरेथॉनमध्ये भारतीय गटात पुण्याच्या संपदा बुचडेने बाजी मारली. तिने ही शर्यत १ तास २३ मिनिटे आणि ४० सेकंदांत पूर्ण केली. पुण्याची विनय प्रकाश मालुसरे (१ तास २५ मिनिटे ४० सेकंद) हिने दुसरा, तर निकिता गोविलने (१ तास ३० मिनिटे १५ सेकंद) तिसरा क्रमांक मिळवला.